## प्रकरण - 18

## प्रकाशन : 17

## इतर उपयुक्त माहिती

नेहमी विचारले जाणारे प्रश्न :

प्रश्न 1 : कोणत्या व्यक्तीला सभासद होता येते ?
उत्तर : वय वर्ष 2 वरील कोणत्याही व्यक्तीला सभासद होता येते.
प्रश्न 2 : सभासदत्वासाठी अर्ज विहित नमुन्यात द्यावयाचा असतो का ?
उत्तर : होय. हा अर्ज उपलब्धतेनुसार जलतरण तलाव कार्यालयात रु.50/- शुल्क रोखीत भरुन प्राप्त करता येतो.
प्रश्न 3 : ह्या अर्जाच्या वैधतेचा कालावधी काय आहे ?
उत्तर : हा अर्ज विकत घेतल्यादिनांकापासून 10 दिवस वैध असतो.
प्रश्न 4 : रोख खिडकीच्या वेळा काय आहेत ?
उत्तर : रोख खिडकीच्या वेळा :-
1) 8.00 a.m. to 10.00 a.m.
2) 3.30 p.m. to 5.00 p.m. and
3) 6.00 p.m. to 7.00 p.m.
प्रश्न 5 : ह्या अर्जासोबत कोणती कागदपत्रे जोडावी लागतात ?
उत्तर : सभासदत्वासाठीच्या अर्जासोबत वैद्यकीय प्रमाणपत्र; 'छायाचित्रासह ओळख दर्शविणारा पुरावा' आणि , शाळेचे प्रमाणपत्र (फक्त विद्यार्थ्यांकरिता), तसेच वय वर्ष 2 ते 6 मधील मुलांच्या बाबतीत त्यांच्या पालकांचे हमीपत्र, पासपोर्ट आकाराची एक छायाचित्र जोडणे आवश्यक आहे.
प्रश्न 6 : वय वर्ष 2 ते 6 च्या मुलांबरोबर जलतरण तलाव परिसर व तलावामध्ये देखील पालक सोबत असणे बंधनकारक आहे. ?
उत्तर : होय. ह्या मुलांच्या सभासदत्वासाठी अर्ज करताना, त्या अर्जामध्ये छापलेले तसे हमीपत्र त्यांच्या पालकांनी द्यावयाचे आहे.
प्रश्न 7 : पोहण्यास न येणा-या सभासदांना पोहण्यास शिकविण्यात येते का ?
उत्तर : होय. पोहण्यास न येणा-या सभासदांना जीवरक्षक/ जलतरण निर्देशक हे पोहण्यास शिकवितात.
प्रश्न 8 : पोहण्यास न येणा-या सभासदांना पोहावयास शिकविण्याचे अधिकार कोणाला देण्यात आले आहेत ?
उत्तर : फक्त, जीवरक्षक/ जलतरण निर्देशक यांना पोहण्यास शिकविण्याचे अधिकार दिले आहेत.
प्रश्न 9 : पोहण्यास न येणा-या सभासदांना अन्य सभासद पोहण्यास शिकवू शकतात का ?
उत्तर : नाही.
प्रश्न 10 :जलतरण तलावाच्या वेळा काय आहेत ?
उत्तर: सभासदांना पोहण्यासाठी प्रवेश सत्रांमध्ये देण्यात येतो. एक सत्र 45 मिनिटांचे आहे. ह्या सत्रांच्या वेळा खालीलप्रमाणे आहेत :-

1)सकाळी 6.00 ते 6.45 - फक्त पोहता येणा-या सभासदांकरिता
2)सकाळी 7.00 ते 9.45 - सर्व सभासदांकरिता
सत्र : (1) सकाळी 7.00 ते 7.45
(2) सकाळी 8.00 ते 8.45
(3) सकाळी 9.00 ते 9.45
3) दुपारी 3.30 ते 5.30 - फक्त स्त्रियांकरिता
सत्र : (1) दुपारी 3.30 ते 4.15
(2) दुपारी 4.45 ते 5.30
4) सायंकाळी 5.30 ते 6.00 - फक्त स्पर्धकांकरिता
5) सायंकाळी 6.00 ते 7.45 - सर्व सभासदांकरिता

सत्र : (1) सायंकाळी 6.00 ते 6.45
(2) सायंकाळी 7.00 ते 7.45 - फक्त, वय वर्ष 15 वरील सभासदांकरिता

प्रश्न 11 : एका दिवसात किती वेळा आणि किती वेळ सभासदास जलतरण तलावात प्रवेश करण्यास परवानगी आहे ?

उत्तर : सभासदास दिवसातून एकदा एक सत्रात पोहण्यास परवानगी आहे.

प्रश्न 12 : स्त्री सभासदांकरिता राखीव असलेल्या वेळेव्यतिरिक्त इतर वेळांमध्ये देखील स्त्रियांना पोहण्यास मुभा आहे का ?

उत्तर : स्त्री सभासदांकरिता राखीव असलेल्या वेळेव्यतिरिक्त इतर वेळा "खुल्या" असल्यामुळे, ह्या वेळांमध्ये स्त्रियांना पोहण्यास मुभा आहे.

प्रश्न 13 : स्त्रीयांसाठी राखीव असलेल्या वेळेमध्ये लहान मुलांना प्रवेश देण्यात येतो का ?

उत्तर : स्त्रीयांसाठी राखीव असलेल्या वेळेमध्ये, वय वर्षे 2 ते 6 मधील मुलांना त्यांच्या स्त्री-पालकांसमवेत प्रवेश दिला जातो.

प्रश्न 14 : जलतरण तलावांवरील खणांमध्ये किंमती वस्तू ठेवण्यास परवानगी आहे का ?

उत्तर : सर्वथा नाही. सोन्याची साखळी, पैसे, घड्याळ इत्यादी किंमती वस्तू जलतरण तलावावर आणण्यास सक्त मनाई आहे. कपडे, टॉवेल, साबण इ. वस्तू ठेवण्याकरिता खण उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. सभासदाने स्वत:च्या जबाबदारीवर ह्या वस्तू ठेवावयाच्या असून खणांमध्ये ठेवलेल्या कोणत्याही वस्तू गहाळ झाल्यास अथवा चोरीला गेल्यास महानगरपालिका जबाबदार नाही.

प्रश्न 15) : प्रासंगिक पोहण्यासाठी पाहुण्यांना आणण्याबाबत अटी काय आहेत ?

उत्तर : सभासदांना त्यांच्याबरोबर पाहुणे आणण्यास खालील अटींच्या पूर्ततेसापेक्ष परवानगी आहे :-

1) सभासदास पोहता येणे आवश्यक आहे.
2) पाहुण्या व्यक्तीस पोहता येणे आवश्यक आहे.
3) सभासदाने पाहुण्या व्यक्तीची संपूर्ण जबाबदारी घेतल्याबाबतचे विहित नमून्यातील हमीपत्र देणे आवश्यक आहे.
4) पाहुण्या व्यक्तीबाबत नोंदणीकृत डॉक्टरने दिलेले विहित नमून्यातील वैद्यकीय प्रमाणपत्र सभासदाने देणे आवश्यक आहे.
5) सभासदाने पाहुण्यासाठीचे तिकीट खरेदी केले पाहीजे.
6) एक वेळी किती पाहुण्या व्यक्ती असाव्यात यासाठी मर्यादा नाहीत. मात्र, जलतरण तलावावर एक वेळी किती व्यक्तींना प्रवेश द्यावा याबाबत मर्यादा आहेत. त्यानुसार, पाहुण्या व्यक्तींना प्रवेश देणे मर्यादीत राहील.

प्रश्न 16) : खाजगी व्यक्ती अथवा संस्थांना जलतरण तलावाचे आरक्षण देण्यात येते का ? असल्यास त्यांच्या वेळा काय आहेत ?

उत्तर : खाजगी व्यक्ती अथवा संस्थांना जलतरण तलावाचे आरक्षण प्रथम येणा-यास प्राधान्य या तत्वावर विहित शुल्क आकारून देण्यात येते. खालील वेळांमध्ये जलतरण तलावाचे आरक्षण करता येते :-

| | | | |
|---|---|---|---|
| 1) | रविवार व सार्वजनिक सुट्टीचे दिवस | - | सकाळी 12.00 आणि रात्री 08.00. |
| 2) | सोमवार | - | सकाळी 06.00 आणि रात्री 08.00. |
| 3) | मंगळवार ते शनिवार | - | सकाळी 10.00 आणि दुपारी03.00. |